Head Office, Lokmangal
1501, Shivaji Nagar, Pune
411005
020- 25614285
cmmedia@mahabank.co.in

## वृत्तपत्रीय निवेदन

दिनांक 16 जानेवारी 2025

**31** डिसेंबर **, 2024 रोजी समाप्त झालेल्या तिमाहीसाठी अर्धवार्षिक वित्तीय कामगिरी**

**कामगिरीवर एक दृष्टीक्षेप**

31 **डिसेंबर 2023** रोजी समाप्त तिमाहीच्या तुलनेत 31 **डिसेंबर 2024** रोजी समाप्त तिमाही मधील कामगिरी **,**

- एकूण व्यवसाय **16.86%** वाढून **₹507,650** कोटी**.**
- एकूण ठेवी **13.54 %** वाढून **₹ 279,** 007 कोटी**.**
- एकूण कर्ज व्यवहार 21.19 **%** वाढून **₹ 228642** कोटी**.**
- कर्ज व ठेवी यांचे प्रमाण सुधारून 81.95 **%.**
- ढोबळ एन पी ए चे प्रमाणात **1.80%** पर्यंत घट**.**
- निव्वळ एन पी ए चे प्रमाणात **0.20%** पर्यंत घट**.**
- तरतूद समावेशन गुणोत्तर **98.28%.**
- निव्वळ नफा 35.82 **%** वाढून **₹1,406** कोटी**.**
- **परिचालन नफ्यात 14.46% वाढून ₹ 2,303** कोटी**.**
- **निव्वळ व्याज उत्पन्न 19.37 % वाढून ₹ 2,943** कोटी**.**
- निव्वळ व्याज दुराव्यात **(NIM)** सुधारणा होऊन **3.98%.**
- खर्च व उत्पन्न प्रमाण◌ात सुधारणा होऊन **at38.27%.**
- अस्तीवरील परताव्यात **(ROA)** सुधारणा होऊन **1.78%.**
- भांडवलावरील परताव्यात **(ROE)** सुधारणा होऊन **22.36%.**
- भांडवलातील ( भारीत ) जोखिमी अस्तीचे गुणोत्तर **18.71%** त्यापैकी प्रथम श्रेणीचे भांडवल **14.70%.**

**नफाक्षमता ( दिनांक 31 डिसेंबर_2025** रोजी समाप्त तिमाही )

- वित्त वर्ष 2024 च्या तिसऱ्या तिमाहीतील ₹ **1036 कोटी** निव्वळ नफ्याच्या तुलनेत वार्षिक आधारावर वित्त वर्ष 2025 च्या तिसऱ्या तिमाहीत 35.82 % वाढ होऊन निव्वळ नफा ₹ 1,406 **कोटी** .
- वित्त वर्ष 2024 च्या तिसऱ्या तिमाहीतील ₹ 2012 कोटी परीचालानात्मक नफ्याच्या तुलनेत वार्षिक आधारावर वित्त वर्ष 2025 च्या तिसऱ्या तिमाहीतील परीचालानात्मक नफा 14.46% वाढ होऊन ₹ 2,303 कोटी. तिमाही आधारावर यात 4.59 % सुधारणा .
- वित्त वर्ष 2024 च्या तिसऱ्या तिमाहीतील निव्वळ व्याज उत्त्पन्न ₹2,466 कोटीच्या तुलनेत वार्षिक आधारावर 19.37% वाढ होऊन वित्त वर्ष 2025 च्या तिसऱ्या तिमाहीत निव्वळ व्याज उत्पन्न ₹2,943 कोटी. तिमाही आधारावर यात 4.86 % सुधारणा
- वित्त वर्ष 2024 च्या तिसऱ्या तिमाहीतील निव्वळ महसूल ( निव्वळ व्याज उत्पन्न + अन्य उत्पन्न ) ₹ 3,731 कोटीच्या तुलनेत वित्त वर्ष 2025 च्या तिसऱ्या तिमाहीत 18.61% **ने वाढून** ₹ 3,761 कोटी. तिमाही आधारावर यात 3.68 % सुधारणा
- वित्तीय वर्ष 2024 च्या तिसऱ्या तिमाहीत खर्च व उत्पन्न यांच्या असलेल्या 36.04% गुणोत्तरात वित्तीय वर्ष 2025 च्या तिसऱ्या तिमाहीत 38.27% पर्यंत सुधारणा . दिनांक 30 सप्टेंबर 2024 रोजी समाप्त तिमाहीत हेच गुणोत्तर 38.81%.
- अस्तिवरील परताव्यात वित्तीय वर्ष 2024 च्या तिसऱ्या तिमाहीतील 1.55% **व** वित्तीय वर्ष 2025 च्या दुसऱ्या तिमाहीतील 1.74 % च्या तुलनेत तिसऱ्या तिमाहीत 1.78 % पर्यंत सुधारणा.
- समभागावरील परताव्यात वित्तीय वर्ष 2024 च्या तिसऱ्या तिमाहीतील 24.51% **व** वित्तीय वर्ष 2025 च्या दुसऱ्या तिमाहीतील 26.01 % च्या तुलनेत वित्तीय वर्ष 2025 च्या तिसऱ्या तिमाहीत 22.36 % पर्यंत सुधारणा .
- **नफाक्षमता (** दिनांक 31 डिसेंबर 2024 रोजी समाप्त नऊमाही )
- 31.12.2023 रोजी समाप्त पहिल्या नऊमाहीत ₹ 2837 कोटी निव्वळ नफ्याच्या तुलनेत वार्षिक आधारावर वित्त वर्ष 2025 च्या 31.12.2024 रोजी समाप्त नऊमाहीत 41.98 % वाढ होऊन निव्वळ नफा ₹ 4027 कोटी
- 31.12.2023 रोजी समाप्त पहिल्या नऊमाहीतील ₹ 5,796 कोटीच्या परीचालानात्मक नफ्याच्या तुलनेत वार्षिक आधारावर वित्त वर्ष 2025 च्या 31.12.2024 रोजी समाप्त नऊमाहीतील परीचालानात्मक नफा 17.32 % वाढ होऊन रु 6799 कोटी
- 31.12.2023 च्या पहिल्या नऊमाहीतील निव्वळ व्याज उत्त्पन्न रु 7237 कोटीच्या तुलनेत वार्षिक आधारावर 18.12 % वाढ होऊन वित्त वर्ष 2025 च्या 31.12.2024 रोजी समाप्त नऊमाहीतील निव्वळ व्याज उत्पन्न रु 8549 कोटी आहे.
- दिनांक 31.12.2024 रोजी समाप्त वित्त वर्ष 2025 च्या पहिल्या नऊमाहीमध्ये शुल्काधारित उत्पन्न वार्षिक आधारावर 16.99 % वाढून रु 1226 कोटी
- दिनांक 31.12.2023 च्या पहिल्या नऊमाहीतील खर्च व उत्पन्न यांच्या असलेल्या गुणोत्तरात 37.10 % वरून वित्तीय वर्ष 2025

च्या 31.12.2024 रोजी समाप्त पहिल्या नऊमाहीत 38.32 % पर्यंत सुधारणा.

- अस्तिवरील परताव्यात वित्तीय वर्ष 2024 च्या पहिल्या नऊमाहीतील 1.42 % **च्या तुलनेत** वित्तीय वर्ष 2025 च्या पहिल्या नऊमाहीत 1.74% पर्यंत सुधारणा.
- समभागावरील परताव्यात देखील वित्तीय वर्ष 2024 च्या पहिल्या नऊमाहीतील 22.70% च्या तुलनेत वित्तीय वर्ष 2025 च्या पहिल्या नऊमाहीत 23.41 % पर्यंत सुधारणा .

**अस्ति व दायीत्वे**

- वार्षिक आधारावर एकूण व्यवसायात 16.86 % वाढ होऊन ₹ 507,650 कोटी .
- वार्षिक आधारावर एकूण ठेवी 13.54 % वाढून **₹** 279,007 कोटी.
- वार्षिक आधारावर एकूण कर्ज व्यवहार 21.19 % वाढून **₹** 228,642 कोटी .
- वार्षिक आधारावर रिटेल, शेती व सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्राशी निगडीत व्यवसायात 23.76% **वाढ**
- रिटेल कर्जवाटपात 24.45 % वाढून **₹** 61157 कोटी, व सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्राशी निगडीत कर्जवाटप 20.80 % वाढून **₹** 47606 कोटी .

**भांडवल पर्याप्तता :**

- एकूण बेसिल 3 भांडवल पर्याप्तता अनुपात 18.71 % पर्यंत सुधारणा व त्यापैकी प्रथम श्रेणीतील सर्वसामान्य समभाग गुणोत्तर 13.60%.
- अस्तिंची गुणवत्ता **:** दिनांक 31.12.2023 च्या तुलनेत ढोबळ एन पी ए चे 2.04 % प्रमाण हे 31.12.2024 रोजी सुधारणा होऊन 1.80 % पर्यंत घटले आहे . दिनांक 30.09.2024 रोजी हेच प्रमाण 1.84 % होते .
- दिनांक 31.12.2023 च्या तुलनेत निव्वळ एन पी ए चे 0.22 % प्रमाण हे 31.12.2024 रोजी सुधारणा होऊन 0.20 % पर्यंत घटले आहे . दिनांक 30.09.2024 रोजी देखील हेच प्रमाण 0.20 % होते.
- दिनांक 31.12.2023 च्या तुलनेत तरतूद समावेशन गुणोत्तराचे चे 98.40 % प्रमाण हे 31.12.2024 रोजी घटून 98.28 % .

गुंतवणूकदरांसाठी सादरीकरण बँकेच्या www.bankofmaharashtra.in या संकेतस्थळावर स्वतंत्रपणे सादर करण्यात आले आहे

उच्च श्रेणी व्यवसाय (₹ कोटी)

| तपशील | रोजी समाप्त नऊमाही | | वाढ (%) |
|---|---|---|---|
| | डिसेंबर 23 | डिसेंबर 24 | वार्षिक |
| एकूण व्यवसाय | 434,404 | 507,650 | 16.86 |
| ठेवी | 245,734 | 279,007 | 13.54 |
| त्यापैकी कासा | *123,322* | *137,493* | 11.49 |
| एकूण ठेवीमध्ये कासाचा हिस्सा | *50.19* | *49.28* | |
| ढोबळ कर्जे | 188,670 | 228,642 | 21.19 |

नफाक्षमता (₹ in कोटी)

| तपशील | रोजी समाप्त तिमाही | | | बदल (%) |
|---|---|---|---|---|
| | डिसेंबर 23 | सप्टेंबर 24 | डिसेंबर 24 | वार्षिक |
| एकूण उत्पन्न | 5,851 | 6,809 | 7,112 | 21.55 |
| एकूण खर्च | 3,839 | 4,607 | 4,809 | 25.27 |
| परीचालानात्मक नफा | 2,012 | 2,202 | 2,303 | 14.46 |
| कर वगळता अन्य अपरिहार्य तरतुदी | 943 | 822 | 841 | (10.82) |
| करपूर्व नफा | 1069 | 1,380 | 1,462 | 36.74 |
| कर | 34 | 53 | 56 | |
| निव्वळ नफा | 1036 | 1, 327 | 1,406 | 35.82 |

ताळेबंद (₹ in कोटी)

| दायीत्वे | रोजी समाप्त नऊमाही | | |
|---|---|---|---|
| | डिसेंबर 23 | सप्टेंबर 24 | डिसेंबर 24 |
| भांडवल | 7,081 | 7,081 | 7692 |
| राखीव व अधिशेष | 12,366 | 15,605 | 19843 |
| ठेवी | 245,735 | 276,289 | 279007 |
| कर्जे | 7,322 | 10,482 | 15164 |
| अन्य दायित्वे व तरतूदी | 6,913 | 7,518 | 7989 |
| एकूण | **279, 417** | **316,975** | **329695** |
| **अस्ति** | | | |
| रोकड व भारतीय रिझर्व बँकेतील शिल्लक रक्कम | 13,512 | 16,574 | 15,466 |
| अन्य बँकांच्या मधील शिल्लक रक्कम व अल्प सूचनेवर प्राप्तव्य रकमा | 5224 | 22 | 20 |
| गुंतवणूक | 66,743 | 77,816 | 80,544 |
| कर्जे ( निव्वळ ) | 185,217 | 213,927 | 224,962 |
| स्थावर अस्ति | 2,144 | 2,379 | 2379 |
| अन्य अस्ति | 6,577 | 6,258 | 6,324 |
| एकूण | **279, 417** | **316,975** | **329,695** |